म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय नाटक
दा. क्र.

म. ग्रं. सं. ठाणें
विषय नाटक
लेखक केळकर ना. भा.
सन १८९५
संग्रहालय क्रमांक
पुस्तकाचें नांव

ना. ३८
३

# रूपनिधि

हें नाटक

वामन भास्कर केळकर

यांणीं

तयार करून

ज्ञानबोधक छापखान्यांत

छापिलें

---

किंमत ६ आणे

शके १७८७

Krishnarao Vasudev Jarade

No 2

श्रीमंत सकळगुण अखंडीत लक्ष्मी आलंकृत रा०
रा० खंडेराव महाराज गायकवाड, सेनाखासखेल
समशेर बहादर यांस.

आपली दयाळू व करूण मुहुर्ती मनांत आणून हा
ग्रंथ मी आपणास परम प्रीतीनें नजर केला असे.

आपला आज्ञा धारक,
वामन भास्कर केळकर.

# प्रस्तावना

आलिकडे संस्कृतांत व इंग्रेजींत विद्वान असलेल्या लोकांची मराठी भाषेवर चांगली अभिरुची बसल्यामुळें सदरील जुन्या दोन भाषेंत असलेल्या चांगल्या विषयांचीं भाषांतरें होऊन तीं केवळ महाराष्ट्र भाषा जाणणाऱ्या लोकांनीं वाचल्यानें त्यांस त्यांचे सहायानें मोठे फायदे झाले आहेत; मराठी भाषेचें मर्मज्ञ (ज्ञान) व ती कशी लिहावी, वगैरे चांगली माहिती होण्यांस सदरील विद्वानच कारणीय भूत आहेत, व त्यांच्या प्रयत्नानें आह्मांस कांहींसें स्वभाषेचें ज्ञान झाल्यामुळें आह्मीं त्यांचे पुष्कळ अंशीं आभार मानतों. व आणखीं असल्या प्रकारचे ग्रंथांचीं भाषांतरें सदरील लोकांच्या प्रयत्नानें मराठींत होऊन, तीं आह्मांस वाचण्यास मिळतील असें इच्छितों.

सदरहू कारणानें माझे मनांत असा उद्देश येऊन "कृपनिधि" या नावाचें मी एक कल्पित नाटक तयार करून छापिलें आहे, व सदरहू ग्रंथा बद्दल विद्वान लोकांस माझी अशी विनंती आहे की, हा माझा ग्रंथ करण्याचा क्रम पूर्वींचाच आहे, व केवळ ग्रं

थ लिहिण्या पुर्ते मला ज्ञान आहे असे माझें; अशा अनेक कारणावरून या माझ्या ग्रंथांत ज्या चुकी असतील त्या मला विद्वान लोकांनी क्षमा करून कळवाव्या; ह्मणजे मी त्यांचा मोठा आभारी होऊन, या ग्रंथाची पुनरावृत्ती काढण्याचे वेळेस सुधारून नीट करीन तर विद्वान लोक माझ्यावर क्षमा करून कळवितील असें इच्छितों.

वा॰ भा॰ के॰

# प्रवेश १ ला.

अंक १ ला स्थळ. ( मुक्ताबाईचा महाल )

मुक्ताबाई, शूरसेन, व मुलगा ( कृपनिधि )

शूरसेन, — माझ्या उदरीं हें एक पुत्ररत्न जा भगवंतानें निर्माण केलें, त्याच जगदिशास करुणा येवो, आणि शतायुषी करो, ह्मणजे सगळें मिळविलें.

मुक्ता० — होतें खरेंच ; पण कोणचें बाई अतिशय उपयोगीं नाहीं, मी किती जपत्यें तें माझें मलाच एक ठाउक आहे, कां तर देवाजीनें कुठे आह्मांस दोनचार दिल्हीं आहेत? कोठें बाहेर सुद्धां नेत नाहीं, आपलें मनच मेलें मनांत नाना तऱ्हेचें कलंक आणितें, आपलें असें वाटतें देवा, यास जर कुठे बाहेर नेलें तर कुणाची दृष्टि पडेल काय? कोणी पापी याच्यावर दुष्ट नजर ठेवील काय? असे तर्क मनांत येऊं लागतात ह्मणून कुठे बाहेर जाणें नाहीं, कुठे देवास जाणें नाहीं, तें कांहीं नाहीं आपलें घर बरीं कीं आपण बरीं आणि हे दुष्ट तर मला यमा सारखे दिसतात, मला आपलें असें वाटतें कीं, तेह्मांच घात करतील.

शूर० — अग अगदीं वेडी आहेस समजलीस, काय तुझे तरंग तरीहे, मनुष्यानें कुठे माण्याचें न सीब फिरविलेलें एकिलेंस तरी आहेस, आणि त्यां त तुला त्याची धास्ती ह्मणतेस तर तें मनांत स्फद्वां आणूं नको; समजलीस, सावत्र झालें ह्मणून काय झालें तें काय अगदीं तुझ्या मनांत यमच लागून गेले आहेत वाटतें, अगदीं गकशी तूं वेडी या तर्का चा मार्ग स्फद्वां सोडून दे, समजलीस असली शं का मनांत स्फद्वां आणूं नको.

मुक्ता० — मी ह्मटलें तरी कुठे हे घात करतील ह्म णून मला आपलें त्यांचीं स्वरूपें पाहून मात्रच अ- सें वाटतें, एका साररव्या एक अगदीं चौघांच्या ही बाई उग्रच मुद्रा.

शूर० — अग, चेहेरे उग्र असले ह्मणून काय झालें, पुरुषांचे चेहेरे उग्रच असावे, वीर आहेत कीं कोण आहेत? असें वेडया साररवें कां मनांत आणतेस, बरें जातों आतां समजलीस असले तर्क मनांत स्फ- द्वां आणूं नको.

मुक्ता० — पण बाई येणें मात्रच फार विलक्षण.

# प्रवेश १ ला.

अंक १ ला स्थळ.( मुक्ताबाईचा महाल )

मुक्ताबाई, शूरसेन, व मुलगा ( कृपानिधि )

शूरसेन, — माझ्या उदरीं हें एक पुत्ररत्न जा भगवंतानें निर्माण केलें, त्याच जगदिशास करुणा येवो, आणि शतायुषी करो, ह्मणजे सगळें मिळविलें.

मुक्ता० — होतें खरेंच ; पण कोणचें बाई अतिशय उपयोगीं नाहीं, मी किती जपल्यें तें माझें मलाच एक ठाउक आहे, कां तर देवाजीनें कुठे आह्मांस दोनचार दिल्हीं आहेत? कोठें बाहेर सुद्धां नेत नाहीं, आपलें मनच मेलें मनांत नाना तऱ्हेचें कलंक आणितें, आपलें असें वाटतें देवा, यास जर कुठे बाहेर नेलें तर कुणाची दृष्टि पडेल काय? कोणी पापी याच्यावर दुष्ट नजर ठेवील काय? असे तर्क मनांत येऊं लागतात ह्मणून कुठे बाहेर जाणें नाहीं, कुठे देवास जाणें नाहीं, तें कांहीं नाहीं आपलें घर बळी कीं आपण बळी आणि हे दुष्ट तर मला यमा सारखे दिसतात, मला आपलें असें वाटतें कीं, तेच्यांच घात करतील.

शूर० — अग अगदीं वेडी आहेस समजलीस, काय तुझे तरंग तरी हे, मनुष्यानें कुठे माण्याचें नसीब फिरविलेलें एकिलेंस तरी आहेस, आणि त्यांत तुला त्याची धास्ती ह्मणतेस तर तें मनांत स्वप्नां आणूं नको; समजलीस, सावत्र झालें ह्मणून काय झालें तें काय अगदी तुझ्या मनांत यमच्च लागून गेले आहेत वाटतें, अगदीं गकशी तूं वेडी या तर्काचा मार्ग स्वप्नां सोडून दे, समजलीस असली शंका मनांत स्वप्नां आणूं नको.

मुक्ता० — मी ह्मटलें तरी कुठे हे घात करतील ह्मणून मला आपलें त्यांचीं स्वरूपें पाहून मात्रच असें वाटतें, एका सारख्या एक अगदीं चौघांच्या ही बाई उग्रच्च मुद्रा.

शूर० — अग, चेहेरे उग्र असले ह्मणून काय झालें, पुरुषांचे चेहेरे उग्रच्च असावे, वीर आहेत कीं कोण आहेत? असें वेडया सारखें कां मनांत आणतेस, बरें जातों आतां समजलीस असले तर्क मनांत स्वप्नां आणूं नको.

मुक्ता० — पण बाई येणें मात्रच फार विलक्षण

गडयं, काय रात्रीं आठ आठ नऊ नऊ वाजे पर्यंत सु
द्धां घरचीं आठवण होत नाहीं, मेले चाकर ते सुद्धां
घटकाभर दिवस उरला ह्मणजे घरचा रस्ता धरितात.
मेलीं लोक कामें करितात कीं नाहीं; कां एक आपणच
काम करितों.

शूर० — बोलतच बसलों तर अस्तमान झालें तरीं
सोडणार नाहींस "जातो"

---

## प्रवेश २ अंक १ ला.

विशालाक्ष, रुपाक्ष, शामदत्त, आणि द्विबाहु.

विशा० — (विचारांत) बधुवर्ग हो, कसें करतां,
पहा काय तें सावत्र भाऊ इतका मात्र फेर; परंतु त्या
च्या व आपल्या धंद्यांत कितीबरें रुपांतर त्यांनीं रा
ज्याधिनांवर बसावें, व आपण तेथेंच कारकुना सा
रखें काम करावें काय? परमेश्वर ज्यांस संपत्ति दे
तो तो कांहीं सुद्धां विचार करीत नाहीं. मग आप
णांस तरी विचार कराला पाहिजे.

रुपा० — मग आपणांस तरी विचार कराला
पाहिजे. ज्या ठिकाणीं आपल्या दादांनीं परकीय

मानलें तीर्थें आपणांस मानण्यांस काय हरकत? त्यांत ते तर वडील आहेत मग त्यांच्या आचरणांप्रमाणें आपणांस चालण्यास हरकत कोणची?

ग्राम० - हरकत कशाची, परंतु-

द्विजा० - विचारांत परंतु सबिलकुल आमंत्रण कद्धां नको, मग त्या बुवांस या स्थळांहून काळें करून जाऊं द्या कसें? द्या त्यांचें नाव सोडून-

ग्राम० - खरेंच दिली त्या दुष्टास रजा हरकत कशाची इतकें बोललों असून कद्धां त्याची येण्याची इच्छा होती काय?

द्विजा० - सगळें मी ऐकून घेतलें, पण हें असाध्यसें दिसतें बा मला कां ह्मणाल, तर तो आज या पृथ्वीचा राजा आहे, फार काय पण त्याच्या आज्ञेला आज निर्जीव पदार्थ जीं झाडें आहेत, तीं कद्धां माना डोलवितील मग साधारण प्राण्याची गोष्ट कशाला पाहिजे, आणि तुमच्या आज्ञेस साधारण गरीब बिचारे चाकर कद्धां मानणार नाहींत, मग त्या अघटित कृत्यांत हात घालून साध्य कराल तरी कसें?

विशा० — त्याची तुह्मांस काळजी नको, तशाच जर कांहीं मसलत शोधून काढली आणि जर ती तुह्मांस साध्य अशी वाटली, तर तुह्मी सहाय क राल कीं नाहीं?

ढूबा० — आमचें सहाय तर आहेच आहे, पण बाबा, असाध्य असें निशंरवा मनांत येते, पण ऐकूं द्या तरी मसलत?

विशा० — ऐका, सांगतों त्यांचा नित्य नेम तर रा त्रीस देवदर्शनास जाण्याचा असतो कीं नाहीं?

रूपा० — बरें, बरें, हो रात्रीस मध्यानींस श्रीसां बाच्या देवालयीं पुत्र संपत्ति करितां जात असत खरें, व ती त्यांची कार्य सिद्धी ही झाली व त्याच वेळेस आणिक त्यांचा पूजा करण्याचा ही नेम आहे.

विशा० — मग आणखीं काय पाहिजे? बरें हें त री तुमच्या तोंडानेंच कबूल झालेंना? बरें, दुसरें कोणी बरोबर असतें कीं काय?

ढूबा० — हो, बरोबर एक चाकर व एक ब्राम्हण असे असतात.

विशा० — ब्राह्मण आणि चाकर हे नित्यच बरो

बर असतात किंवा कधीं कधीं असतात?

रुपा० – नित्यच असतात असा कांहीं नेम नाहीं.

विशा० – वाः मग तर यांत सर्वच काम झालें? ती च वेळ.

हूबा० – मग काय तुह्मी त्या वेळेस त्यांचा घात करणार?

विशा० – हो अजून संशय आहे कीं काय?

हूबा० – बरें ठीक आहे, आमची कांहीं कोणाच्या ह्या गोष्टीस ना नाहीं, पण जर साधलें तर ठीकच आहे, नाहींतर मात्रच आणखीं कष्ट भोगावे लागतील, आणि आपणांस फक्त राज मातीच्च करून घेण्या करितां व त्यांच्या आंगीतर कांहींच दोष नसतांना हें ठीक नव्हे, पण सांगतों मात्रच साधे असें करा ह्मणजे सगळें मिळविलें.

---

## प्रवेश २ रा. अंक १ ला.

( मुक्ताबाईचा महाल )

मुक्ताबाई, मथुरा दासी, आणि मुलगा.

मुक्ता० – ( दाशी कडे पाहून ) या माझ्या राज्य

बिंडयाला एकदां बोलतां चालतां येऊन चांगलें लिहितां वाचतां एकदां येऊं लागेल, तेव्हांच हा जीव खालीं पडेल, नाहींतर लोकांना थोडीं मेलीं मुलें होतात, काय झालें आणि नाहीं सारखेंच, आपले द.

मथु० — ( हातांत मुलास घेऊन. तसें कां होईल बाई साहेब, "जाति तशी पुती" माझ्या जातींत ह्मणावा कोणी तरी अजून वेडें झालें आहे काय? मग आमचे धनीच कां असे होतील.

मुक्ता० — ( मुलास जवळ घेऊन ) होय कारे बाळा, माझा बाळ कसा ग तरी शाहाणा आहे ( इतक्यांत मुलगा जांभय देतो ) बाळा, झोंप कांरे येते? ( दासीस ) घे ग निजीव तरी याला, उच्च डच्चा जांभया देऊं लागला आहे, आतां निजेल ह्मणजे मग रात्रीं मला जागविलें पाहिजे कीं नाहीं.

'पाळण्यांत घालून हालवितें'

गाणें (चाल) खरी झाली कृष्णाला हृष्ट कीं वाटते.

खरी आली बाळकाला निद्रा कीं वाटतें, जांभया देतो भारी निद्रेनें दाटतें ॥ धृ० ॥ हालवितें-

पालवितें आनंद वाटतो, देखतां मुख चंद्र मद नचि भासतो, कीं आला कोण योगी रवी शशी दिसतो, स्मरवी करील तोच याते ओघ भारी-लोटतो, "चालु" मायेचा पूर ह्याची तव चरणीं लोटीतें, स्वहस्तें तव शरीर कृपेनें झाकीतें, ( इत-क्यांत शूरसेन येतो ) पलंगावर बसली आहे.

शूर० — कां, झोंप नाहीं का अजून सोडीत, या झो पेनें तर बाबा शिकस्त केली, झोंप झोंप तरी बेताची असावी नाहीतर अगदीं सगळीच झोंप होईल? अग ये झोंपे ऐकलेंस काय?

मुक्ता० — पुरे मेलें, कोणीं जर ऐकिलें तर ह्मणेल ही मेली कांहीं एक काम करीत नाहीं, धंदा नाहीं, उ द्योग नाहीं, आपली झोंप घेत बसते.

शूर० — मग मी बोललों हें सगळें खोटेंच का शेवट, बरें बरें तसेंच का होईना? कोणी कडून त्या बाईचा फेरा आपल्यावर नसला ह्मणजे झालें.

मुक्ता० — मग कां मला उगीच छळ करावा सम जून उमजून, त्याला तरी आतांच जरा झोंप लाग ली ह्मणून जरा स्वस्थ बसलें पलंगावर, आणि आ-

गली तरी येण्याची वेळ एकच कुठे आहे, आतांच स्व
स्थ बसलें होतें, तों इतक्यांत यावयाचें.

शूर॰ — बरें, देवपूजेचें सामान तर तयार आ
हे नां?

सुरूपा॰ — आज पर्यंत कधीं तरी नाहींसें झालें हो
तें काय? सगळीं तयारी करून ठेविली आहे, पण कु
तर्क घेण्याची चालच, त्याला काय करावें बाई.

शूर॰ — अरे कोण आहेरे चावडीवर.

चाकर. — जी सरकार मी हाये.

शूर॰ — किती रात्र झाली.

चाक॰ — आतांच महाराज, पांचाचा ठोका पडला.

शूर॰ — बरें, अकरा घटिका रात्र झाली ह्मण
जे समजीव.

चाक॰ — जी सरकार हुकूम.

---

## प्रवेश ४ था. अंक १ ला.

विशालाक्ष, रुपाक्ष, शामदत्त, आणि द्विवाकु.

विशा॰ — (एकांतात) कसरे ताना, विचार होतां
त्याचा शेवट जवळ आला आहे तर निश्चयात्मक उर.

वून कृतांत स्थळीं चला.

## आर्या.

बहुतची विचार करितां, आला हो वेळ सावधान असा॥
असुनी सर्व ही स्रव तें, दुःख देत्या वायकासीं मारी कसा॥

विशा० — बाबानो, तुमच्या पदरांत परमेश्वरानें स र्व स्रव घातलें आहे; परंतु तुह्मांस जो एक वृक्ष दुःख देणारा या आसमंत भागीं पसरला आहे, त्याला एकदा काढून टाका कसा.

शाम० — मग नाहीं कोणी ह्मटलें आहे, सर्व विचार होऊन त्याचा पूर्वींच सिद्धांत झाला आहे, आतां त्या स्थळीं जाऊन गुप्त मात्र असायाचें, ह्मणजे झालें.

विशा० — कांरे बाबानो तुह्मी कां बोलत नाहीं?

रूपा० } — आह्मांस विचारिलेंच ह्मणून सांगतों
ह्विबा० } आतां, एक त्यास मारलें ह्मणून सगळीं च विघ्नें कशीं टळतील, बाबानों, अरे त्यास आज लक्षानुलक्ष चाकर तर आहेत; परंतु चाकराची गो ष्ट समयास ठेविली एकिकडे, पण त्याची धर्मपत्नी, मुलगा, हे तुह्मांस कसें रे जीरूं देतील? आणि उगीच असें वेड्या सारखें कां बेत करतां?

विशा० — अगदीं रे वेडे, त्याची योजना पूर्वींच केलेली आहे तो यम सदनाचा मार्ग क्रमण करूं लागा त्यावर, ती नायको सती गेल्या शिवाय कालत्रयीं स्‍हां राहाणार नाहीं मग मुलगा कीं नाहीं, त्यास देऊं एकाद्या रानांत सोडून ह्मणजे झालें.

रूपा० — ती सती जाईलच असा मात्र सिद्धांत पाहिजे; ह्मणजे झालें, मुला विषयीं झाला संशय निवारण.

विशा० — यास प्रमाण तिची पूर्वीची प्रतिज्ञा.

द्वि बा० — खरें, खरें, आतां आलें लक्षांत, चला आतां कोणाचा नां आहे.

( सर्व निघून रस्त्यांत जाऊन बसतात )

शूर० — भगवंताचें नित्य नियमा प्रमाणें दर्शन घेण्याचा समय अगदीं जवळ आला आहे, तर आतां शेवेस सादर झालें पाहिजे.

---

## प्रवेश ५वा. अंक १ला

"अरण्यी मार्गावरील जागा"

विशालाक्ष, रूपाक्ष, शामदत्त, द्विबाहु व शूरसेन येत आहे.

विशा० - आतां एकच सांगतों, तो कशी ही विनंती करो, कसा ही करुणा स्वरानें भाको, नाना तऱ्हा करो, एकच की घे मुसळ की ठेंच डोकें.

रुपा० - त्याची तुह्मांस अगदीं काळजी नको, तुह्मीं पुढें आणि आह्मीं मागें, ( शूरसेन जवळ आला सें पाहून )

विशा० - संभाळ शामदत्त, आडवा हो, अरे आडवा हो, अरे पुढें हो. ह्मणतों ना.

शाम० - दादा, घाबरूं नका, आतां आपल्या पंचाननाच्या जाबड्यांतून या गाईची सुटणूक होऊन, जाईल तरी कशी?

( इतक्यांत शूरसेन अगदीं जवळ येऊन )

शूर० - मध्यान रात्रीच्या समयांस गावांत, रस्त्यावर चार पांच माणसांची हालचाल कशाची? चोर तर नव्हेतना? परंतु असें होंऊनये. चोरांचा प्रवेश या शहरांत होईल तरी कसा? छे, चोराची शंका ही केवळ मिथ्या दिसते.

विशा० - ( शूर० चें बोलणें एकून ) दादा, महाराज, हे चोर तर खरेच परंतु धान्य किंवा धन

हें चोरून; प्रजेचा नाश करणारे नव्हेत तर, फक्त आपला प्राण मात्रच हरण करून नेणारे चोर खरे.

शूर० — अरे विशालाक्षा, तुह्मी चौघे ही जमून अपरात्रीस एथें येण्याचें तुह्मांस कारण काय?

विशा० — एक वेळ आपणांस कारण निवेदन केलेंच आहे, आतां तुह्मांस एकच सांगतो, जर पुढें परमार्थ साधन करण्याचें असेल; तर देवाचें नाव घ्या. उगीच आमच्या क्रोधाच्या प्रज्वलीत अग्नीत तुह्मी आपले शब्द हे केवळ आज्य घालून, आमच्या क्रोधाच्या अग्नीस प्रदीप्त करूनका; तुह्मांस एकच सांगतों, आमच्या क्रोधाच्या तीक्ष्ण शस्त्रास तुमच्या प्राणा शिवाय दुसरी कशाची आशा नाहीं.

शूर० — बाबानो, तुमचा क्रोधाग्नी इतका प्रज्वलीत होऊन मज पामराचीच का आहुती मागतो? तुमच्या क्रोधाचें तीक्ष्ण शस्त्र माझ्याच का प्राणांवर हेत ठेवितें; इतक्या तुमच्या क्रोधाच्या आवेशास मीच कसा पुरे होईन, असे वेडया-

साररवे बेत करून का, जीं तुमचीं आवेश रूप शस्त्रांचीं अग्रें प्रदीप्त झालीं आहेत त्यांचें समाधान होई असें मागा. देण्यास असमर्थ आहे, असें समजून का.

## आर्या.

अनुचित कर्में करितां, नव्हे सफल च्वि तुह्मांशीं तेंरवचित॥
जें तुह्मां वाटे हो, मागा देईन तुह्मां असे उचित॥१॥

शूर० - बाबानो, अनुचित कर्म करून तुह्मांस तें सफल होणार नाहीं. सांगतों ऐका; या वेळेस मी सर्व राज्य सुद्धां सोडून तुह्मांस देऊन, तुमचें दास्यत्व करण्यास तयार आहें.

## साकी.

दास ही झालों परंतु ऐका, द्या वचनीं तुह्मी मान॥
राज सोडितों सेवा पत्करितो, नका कापूं तुह्मी मान॥

शूर० - राज्य सोडून अगदीं हलक्या जातीची नीच सेवा, सुद्धां करण्यास तयार झालों; चांडाळानों, तुमचें अजून सुद्धां मन कसें द्रव घेईना? नका भलताच आग्रह धरूं, एक वेळ वचन तर पहा.

विशा० - दादा, प्राणाहून दुसरें आपणास का

हींच जाजती नसतें खरें, परंतु ज्या प्रमाणें व जा
विचारानें तुह्मी आपला प्राण वाचविण्या करितां
नाना तऱ्हा करीत अहांत; तथापि तुह्मांस यास
मर्थी आह्मीं सोडिलें असतां, मग आह्मीच आ
पल्या प्राणांस मुकूं. मग ज्या न्यायानें व ज्या प-
र्यायानें तुह्मी आमची विनवणी करितां त्याच
मानानें तुमची आह्मांस करावी लागेल, ह्मणून
एकच सांगतों, या वेळेस एक यश येवो किंवा
अपेश येवो; या समयीं या गोष्टींचा निर्णयच
केला पाहिजे.

शूर० — बाबानों, ज्या पेक्षां तुमचीं प्रज्वलीत
शस्त्रें माझ्या देहाच्याच आहुती वर हेत ठेविता-
त, त्या पेक्षां आतां एक तरी माझी विनंती मान्य
करा.

विशा० — येऊं द्या; येऊं द्या एकदां, काय विनंती
ती, लवकर; उशीर सहन होत नाहीं.

शूर० — मी, जरी आपणांस आज राजा ह्मण
वित आहें, व ही वेळ पर्यंत हें सुख ही भोगीत
आहें, तथापि या समयास मी तुमच्या इच्छेस

अगदीं पात्र झालों आहें, त्यापेक्षां आतां जी तु
ह्मी आज्ञा कराल, ती मला शिरसावंद्य आहे.

सर्वबंधुवर्ग. — दादा, या सर्व ब्रह्म ज्ञानाच्या गो
ष्टी ब्रह्म लोकांस जाऊन स्वस्थपणीं सुखानें त्यां
त सांगा, आह्मांस तुमचें ब्रह्मज्ञान अगदीं नको.

शूर० — ऐका तर, नित्य नेम न टळावा, याजक
रितां भगवंत मूर्ती एक वेळ मला पाहून घेऊं द्या.
आणि मग तुह्मीं आपली इच्छा तृप्त करून घ्या.

बंधूवर्ग. — बरें आहे चला, घ्या नित्य नेम आप
ला करून, मगच आह्मी आपलें साधूं.

(सर्व निघून जातात)

---

## प्रवेश ६ वा अंक १ ला.

सांबाचें देऊळ (विशालाक्ष, रुपाक्ष, शामदत्त,
आणि द्विबाहु)

विशा० — (क्रोधानें) महाराज, सर्वेशाचें दर्श
न घेऊन, अक्षय सुख भोगण्याचा मार्ग क्रमण
करण्यास लवकरच सिद्ध व्हा,

शूर० —(देव पूजा वगैरे करून प्रार्थना करितो)

भगवंता, आज पावेतों या प्राणांस सर्व सुखाचा अमोघ लोंढा आत्मकृपेनें भोगण्यास दिलास, व तव कृपेंकरून जन्ममरणां अंतीं ज्या प्राण्या पासून हा देहाची क्रिया व्हावी, आणि त्याच प्राण्या पासून झाली असतां; शेवटीं आपल्या पदाची प्राप्ती व्हावी, असा शास्त्राचा नियम आहे. असें जें कठीण मायादायक पाश पुत्ररत्न, तें ही मज हत भाग्याच्या पदरीं दिलें; सारांश सर्व सुख दिलेंस. आणि आतां या दुष्टाच्या घातकीय शस्त्रानें घात व्हावा, हें भगवंता आपणास उचीत काय? -आ णखीं शेवटीं मी सर्वांचा वैरी झालों, पुत्र ही दूर, माझी प्राणप्रिया ही दूर, एकंदरीनें सर्वच मला या समयीं दूर झालें; परंतु दयानिधे, या समयीं माझ्या चित्तास अमोघ सुख होत आहे, सर्वांचा वैरी झालों, परंतु अक्षय सुख भोगण्याचीजागा जी वैकुंठ, तिच्या नायकाचा शेवटा मित्र झालों आहे, तर या समयास तें सुख भोगण्यांस लावणें हेंच आपणांस उचित आहे, तेव्हां आतां या दुःखं तून सोडवून आपल्या चरणाचा अक्षय वास द्या.

साकी.

सोडवासोडवा यादुःखांतुनी, तोडबा हे रिपू पाश॥
वज्रासम मज वाटे देवा, तूंची दयाघन ईश॥ १॥

आर्या.

पडलों दुःखींडोहीं, सोडवितां तुजवळें मलान दिसे॥
शोषण करिती माझें, मजला केवळ कृतांत काळ दिसे॥ १

विशा० — महाराज, पुजेतच निमग्न झाला की. काय? हीं शस्त्रें केवळ बहुत दिवसांचा उपोशित जसा प्राणी असतो, त्याप्रमाणें आपल्या प्राणांवर हेत ठेवून आहुतीची वाट पाहात आहेत.

शूर० — बरें आहे बाबानों, ज्याप्रमाणें दासावर ही वेळ पर्यंत, अमोघ दयेचें साधन सोडिलेंत; तसेंच आणिक एक घटिका भर मला आपल्या शस्त्रां पासून रजा होण्याची विनंती करा, या उपर दुसरें कांहीं मागणें नाहीं, मारा तर खरेंच, परंतु माझी एवढी विनंती कसें ही करून खालीं पडूं देऊं नका.

विशा० — बरें आहे दिली आणिक एक घटिकेची रजा.

शूर० — दयानिधे, मज पामराचें हे सत्व किती

पहावें; आतां एकच चरणांशीं विनंती जर आप ण कृपा कराल,तर या दुःष्टांजवळ मागीतल्या वे ळेंत सोडवा, नाहींतर त्यांची शस्त्रें माझ्या प्राणांव र हेत ठेवून बसलींच आहेत.( इतकें ह्मणून कंठ सद्गदीत करून ) भगवंत, माझ्या दुर्बळाचा अंत तरी किती पहावा?( इतक्यांत विमान दिसूं लागतें ) काय तरी विमानाची शोभा ही, आज पर्यंत मी विना कारण या माया दायक पाशाच्या जाळ्यांत गुंतू नव्यर्थच मृत्यू लोकीं वास केला.( इतक्यांत देह नि जीव होऊन पडला तें पाहून सर्व बंधू निघून जातात.)

---

## प्रवेश ७ वा अंक १ ला.

राजवाडा (मुक्ताबाई, पदरची दाशी, मुलगा कृपानिधी )

मुक्ता० — दाशी, आज देवदर्शनाहून अजून कां ग येणें होत नाहीं? ह्मटलें ह्मणजे आज बरो बर कोणी नवतें, जर बाई ब्राह्मण असता, तर मलें मनांत आलें असतें, कीं एकादें अनुष्टान चालवि लें असेल, पण तें बाई कांहीं नाहीं, मग कां उशीर

लागला, कोण जाणें, चावडीवर शिपायाला तरी हाक मारून विचार.

दाशी॰ — हो, मारतें हाक; पण कधीं कधीं येण्यास उशीर होतो, बाई साहेब, आपण इतकें घाबरूं नका.

मुक्ता॰ — नाहीं ग, घाबरूं कशाला, पण आपली चौकशी लर करा.

रूप॰ — आई, मला नेग तिक्के.

मुक्ता॰ — कुठे नेंउं मी आपल्या बाळाला?

रूप॰ — माझा दादा गेलाय तीक्के ने मना.

मुक्ता॰ — नाहीं तिकडे जायाचें जा, अपरात्र झाली आहेना:

रूप॰ — (दाशीकडे पाहून) तूं ने ग मला तिक्के, आई आपली कशी लबाड हाए, आपण कशी जाते तिक्के; मला नाहीं नेत, मी नाहींजा, (दाशी कडे पाहून) ने ग तूं मला (कडेवर घेऊन फसविते)

मुक्ता॰ — माझें बाळ कसें ग तरी शाहाणें आहे, नेईन आं मी आपल्या सोन छकुड्याला, (दाशीस) दाशी उद्यां सांग होग माझ्या बाळाचा मेणा

आणायाला ( मुलाला जवळ घेऊन ) नेईल मी आपल्या बाळाला.

( इतक्यांत चाकर येऊन दुष्ट वार्ता सांगतो )

चाकर. — बाई साहेब, भगवंतानें माझ्याच क सें हो हें दुःख सांगण्याचें कपाळीं आणिलें, माझ्या सारखा दुष्ट प्राणी याजगांत . तर नसेल असें वाटतें; असो, आतां जें असेल, तें खरेंच सांगीतलें पाहिजे. आपल्या स्वामीणीच्या चरणाशीं खोटें बोलावें तरी ही पापच, त्यास आतां यथार्थ च बोलतों.

मुक्ता० — ( घाबरून ) अरे असें दुःखोद्गार का ढीत कां भाषण करितो, माझ्या स्वामीच्या जिवस सुख आहेना?

चाकर. — महाराज, जीव्हा एक्या जाग्यावर जी स्तब्ध बसली आहे, ती हाल चाल सुद्धां करीत नाहीं. या समयास देव जर जन्म मरणा पासून सोडवील, तर फार बरें.

मुक्ता० — ( हें ऐकून घाबरी होऊन पडते ) अरे, जी अवस्था असेल ती लवकर सांग, नाहींतर

मला अखेर वैरी होऊन, हा सर्व जन्म एक एक घटका युगा समान काढीत बसावें लागेल; लोकर सांग, अरे लवकर सांग, हा देह त्या शरीरावर हेत ठेऊन बसला आहे.

चाक० — बाई साहेब, अखेर तसेंच झालें, आपण आपल्या प्राणपतीशीं शेवटीं वैरीच होऊन बसलां, आतां या दासाच्यानें फार बोलवत नाहीं. (असें ह्मणून निचेष्टींत पडतो.)

मुक्ता० — भगवंता, या दाशीवरच कां असा प्रसंग आणलास? माझ्या पापाचें शासन माझ्याच कां नाहीं जिवावर योजिलें? माझ्या प्राणसागरावर, कां असा दुर्घट प्रसंग ओढवला, शीव, शीव, (शोकाग्रस्त होऊन भूमीवर पडते.)

गाणें (चाल) अहारे देवा काय हें करविशी०

अहारे कर्मी केसें हें ओढवलें, संकटीं मजला दासीशी पाडिलें ॥ध्रु०॥ पूर्वी म्या केला घात हो कवणाचा, किंवा म्या हरीला ठेवा हो विप्राचा, त्या योगें जाला नाश प्राणपतीचा, बाळाशी केसें

त्यजुनी यां तें गेलें, अहा०॥१॥ तुह्मां संगें मी ये त्यें प्राणनाथा, जाऊं उभयतां मिळुनी होसत्पंथा, परी आत्म हत्या पडेल मम माथा, ऐशा संकटीं जग दिशा पाडिलें, अहारे कर्म०॥२॥

मुक्ता० (अति दुःखांत) नारायणा, आतां चरणाशीं एकच प्रतिज्ञा, पुनरपी जर घरीं जाईन, तर स्वामी समागमें जाईन, नाहीं तर अखंड सौभाग्य पदरीं बांधून, जगनियंता भगवान, याचे चरणांशीं आह्मीं उभयतां अक्षय सुखानें वास करूं. (इतकें बोलून पतीच्या प्रेताशीं जावयास निघते.)

दाशी० — " दुःखांत" बाई साहेब, हट नका घेऊं, असा हट सत्ययुगांत महान साध्वी घेत असत; आतां या कलि युगांत, एक आपणच अशी प्रतिज्ञा करतांना ऐकिल्यें, बरें आहे ईश्वर करो आणि तुह्मांस भगवंत आपले चरण दाखवो; परंतु आमच्याकडे, व आपल्या बाळाकडे, कांहीं दयेनें पहा, आमचें पालन करतें तर गेलेच; आतां आपण तरी असा हट धरूंनका.

मुक्ता० — माझी तूं आतां उगीच समजूत करूंनको,

माझा सर्व जीव त्या चरणाशीं गुंतला आहे; आतां मला हा माझा बाळ नको; राज्य नको; धनसंपदा नको; दासदासी नको; तें कांहीं नको. एकदां मला त्या चरणाचें दर्शन होऊन आह्मी उभयतां भगवंताच्या पदाचा मार्ग क्रमण करूं लागलों; ह्मणजे झालें, या दुर्घट मायेंत पडून अखेर पदरीं वैधव्य बांधून, शेवटीं या यातनेसच पात्र व्हावयाचें कीं नाहीं, आतां एकच सांगतें, मला एकादा त्याला (मुलाला) डोळेभर पाहून घेऊं द्या, आतां त्याची व आमची भगवंतानें तुटातूट केली, तर अखेरचा आतां त्याचा मुखचंद्र मनभर पाहूं द्या, आणीक सांगतें, आजपासून याचे आई, बाप, सर्वस्वी रक्षण करणार तुह्मीच आहां, यास तुह्मी आपल्या मुलाप्रमाणें सांभाळा, ह्मणजे तोच पुढें तुह्मांस सुख देईल; जरी मी तुह्मांस कधीं कांहीं रागानें बोललें असलें, तरी त्याची मला दया करून, तो राग माझ्या या सकुमारावर काढूं नका; आतां तुह्मी सर्व जण एक चित्तानें वागून, आमचें

नांव लोक विसरत नां असें करा; आतां ज्या ठिका णीं माझा हा सर्व जीव लागला आहे, त्या ठिकाणीं चालत्यें.

दासी० — बाई साहेब, एकूण आपण आमच्या वर खरेंच दुर्ममता केली काय? आतां आह्मी आ पलें हें कृष्णवदन दाखवावें तरी कुणाला?

मुक्ता० — आतां मला बोलवण्यांत गुंतवूं नका. ज्या प्रमाणें सांगितलें आहे त्या प्रमाणें तजवीज ठेवा, ह्मणजे तुह्मी अखंड चिरकाल नांदाल. (इ तकें सांगून स्तब्ध बसते)

दासीजवळ आहेत—मुक्ता० — (पतीजवळ जा ऊन) नारायणा या चरणाची तुटातूट करणें आ पल्यास बरें दिसलें काय? जशी गाईवर व्याघ्र अकस्मांत उडी घालितो, त्या प्रमाणेंच आपली उ डी मज अनाथणीवर कशी आली. असें मी अ- घोर पाप आपल्या गतजन्मी कोणचें आचरण के लें? त्या पापाचें शासन माझ्याच कां देहाजव ळून भोगविलें नाहीं, माझ्या कृत कर्मामुळें मा झ्या स्वामीस असें दुःख प्राप्त झालें काय? हर! हर!

हर! (अति दुःखांत) असें मी अगाध पाप कां
णतें तरी अवलंबन केलें होतें? तें आचरण कर
ते समर्थांच कां मला शासन केलें नाहीं. (त्याहून
दुःखांत) कोण तरी या शरीराची अवस्था, मी
आपल्या पूर्वजन्मीं कोण्या महा पुरुषाचा विना का
रण छळ केला होता काय? किंवा कोण्या महान दे
वतेस, जाणून दोष दिला काय? कीं कोणाचें तरी
दुर्धर पाप आचरण केलें; कोण जाणें, व त्या पापा
चे शासनाचा संबंध माझ्याच कां देहाशीं ठेवि
ला नाहीं. असो, अपराध भगवंता कडे लपणार ना
हीं, त्या प्रमाणें हें मी संकट भोगित आहे, परंतु
इतकेंच कीं, हें दुःख जर माझ्याच देहापासून
भोगविता, तर सार्थक तरी होतें, हे सगळें च उल
टें झालें.

मुक्ता॰ (दासीस) माझी सती जाण्याची तयारी
करा, आतां मी आपल्या स्वामी समागमें अक्षय
सुख भोगण्यास जातें, लवकर तयारी करा (विमा
न दिसूं लागतें) हें पहा, कसें मला करितां विमान आ
हे तें, आतां यांत बसून आह्मी उभयतां जा स्थळा

स महान शूराची स्फूर्ती धारती नाहीं, त्या स्थळीं जाऊं.

दाशी. — आमचे धनी गेले, व आमच्या स्वामीणी ही चालल्या, त्यांस पहा आतां विमान स्पष्टां दिसूं लागलें आहे, बाईसाहेब, आतां आपण चाललांत पती समागमें. भगवंता, आह्मीच तरी कशा हतभाग्य. आमच्या स्वामिणी आजपर्यंत राजस्फरव भोगून अखेर ही त्यांचा शेवट चांगला केला, आमचे धनी व बाई साहेब पुण्यप्राणीच खरे.

मुक्ता. — अग, दाशीनों; आतां उशीर नका करूं, पिवळें पातळ आणा मला नेसवा, माझ्या कुंकुवाचा करंडा आणून मला मळवट भरा. माझे डोळे काजळानें भरून काढा; आणि करा लवकर तयारी, मजसाठी ते शीव दूत वाट पाहात आहेत, आतां उगीच उशीर करून सार्थक नाहीं. चला, करा तयारी. (सर्व तयारी करून सती जाण्या पूर्वी) आतां मी सर्वत्रांस नमस्कार करितें.

जन. — बाई, तुझ्या सारिखी पुण्यशील सती आहे कोण? आह्मां पापभीरूंस तुझा साध्वीचा

नमस्कार करणाला पाहिजे, आह्मींच तुला नम स्कार करितों (नमस्कार करतात) तुमचें जन्मो जन्मीं ईश्वर कल्याण करो, (स्त्रीयांस) आपल्या पती समागमें, अखंड सौभाग्यवती नांदा

| | |
|---|---|
| विशा॰<br>रूपा॰<br>शाम॰<br>द्विवा॰ | वहिनी, आह्मी आपल्यास अनन्य भावें शरण आहों कांहीं सांगणें असल्यास आह्मां दासाला आज्ञा असावी. |

मुक्त॰ – भावोजी, सर्व एक चित्तानें नांदून, ह्या राजाचा आदर करा, आपले चाकर, ब्राह्मण, दास दासी, एकंदर प्राणीमात्रास सुख मिळे असें करा, आपला क्षत्रिय धर्म मोठ्या शौर्यानें चालवा, आणि (मुलास) ह्याला आतां तुह्मी आपला ह्मणा, माझा हेतु होता, त्या प्रमाणें यास विद्येचा अभ्यास चांगला करवा, वडिलांचें नांव राखी अशी नीति शिकवा, अजून तो फारच लहान आहे सारांश जिकडून तुह्मांस बरें वाटेल तसें करा; आणि चिरकाल नांदा, आणखी एक सांगतें, आपल्या विश्वेश्वराच्या

देवालयीं एक नंदादीप आहे, तेथें पांच स्फरू करा, अनुष्टानांस पांच ब्राह्मण आहेत, तेथें पंचवीस ब्राह्मणाचें अहोरात्र चालू करा. आपल्या जवळ शरण आलेल्या अनाथास, तृप्त करीत जा, आतां मी चाललें.

बंधुवर्ग. - ठीक आहे, आपली आज्ञा शिरसा वंद्यच करूं. पण आतां कृपा असो द्या. जा

मुक्ता० - सर्वजन हो अखंड सुखानें नांदा (इतकें बोलून अग्नींत प्रवेश करिते) "लोक शोक करीत घरीं येतात."

पहिला अंक समाप्त.

---

## प्रवेश १ला. अंक २रा.

विशालाक्ष, रुपाक्ष, शामदत्त, द्विबाहु.

विशा० - (आनंदांत) कां, बाबानों सर्व बेत सिद्धीस गेल्या सारखा झाला कीं नाहीं, आपणच आपले कुतर्क घेऊन क्रोधाच्या शस्त्रास बांधट करणार होतीं, परंतु ज्या गोष्टींत मला फ़ायदा वाटला त्याचा निकालच करावयाचा

हा सिद्धांतच होऊन चुकला होता, तद्रुप आप णां सर्वांस बुद्धी झाली, आतां एक थोडासा घोर आहे, तेवढा टाकावा उरकून, म्हणजे मग एकदम निरंवैर राज्य चालविण्यास हरकत नाही.

शाम० — आतां दादा, खचित जर ह्मणाल; तर, असें झालें आहे कीं, जो दुष्ट पाप भिरू आह्मांशीं वैर बुद्धीनें वागत असे, व आह्मी त्याचे प्रत्यक्ष भाऊ असतां, आमची योजना केवळ पदरच्या चाकरांत करीत असे; त्याच्या पासून जन्म घेतल्या प्राण्याचें सुखावलोकन स्वह्नां करूनये असें वाटतें.

विशा० — ठीकच आहे, ज्या पाण्या पासून आपणांस आवत जन्म सुख प्राप्ति झाली नाहीं, त्याच्या मुलाकडे कशाला, परंतु त्याचे अगदी जे प्रिय चाकर ह्मणवितात त्यास स्वह्नां, आपणांस बरें पहावणार नाही, मग तो तर कशाला पाहिजे, तो तर, डाव धरणाऱ्या सर्पाचें पिलूंच आहे.

रुपा० — ज्या पेक्षां जगदिशानें आपणांस हे

दिवस दाखविले, त्या पेक्षां आतां, ह्या विषारु काट्याचा आपल्या घरांत वास कां करूं देऊं नका, आतां, ज्या पंथांस ती उभयतां लागलीं आहेत, तिकडून चाच ह्या ही राजश्रींनां रस्ता दाखविला पाहिजे.

ह्रूबा० – वारे! घातक्यानों, चांडाळानों, त्या शूरसेन दादांचा घात करण्यास जेव्हां तुह्मी सिद्ध झालेत, त्या समयीं मी आपलें अनुमोदन तुह्मांस दिलें; परंतु (दुःखांत) त्या बाळावरील दुर्धट बेत ऐकून माझें हें सर्व आंग दयनें कापूं लागलें आहे, तो केवळ सकुमार चारवर्षांचा बाळ, आणि त्याची मुद्रा तरी कशी फारच गरीब, व रूपानें केवळ मदनास लाजिवणारा, व निरापराधी, असा असून तुह्मी अगदींच कसे निर्दय, त्याणीं काय बरें तुमचें वांकडें केलें आहे, अरे बालहत्येचें पाप तुह्मी आपल्या शिरावर कां ह्मणून घेतां? एक, माण्याचा जर आपल्या हातून घात झाला, तर देहांत प्रायश्चिता शिवाय त्या पासून मुक्त हो-

पद्यास भगवंतानें दुसरें कोणतेंच साधन योजि लें नाहीं, तर आतां ऐका बोल, तुह्मांस कडू ला गूं देऊन का- बावानों, साधारण ज्या वेळेस शंभ र हत्या होतात, त्या वेळेस एक ब्रह्म हत्या होणा र, व अशा शंभर ब्रह्म हत्येस एक स्त्रीच्या हत्ये चें पाप पुरें होतें, व शंभर स्त्री हत्येचे बराबर एक बाल हत्या, असें असून असे भ्रमांत कां प डतां? अरे त्या वरील हत्या केवळ विजा होऊन, तुमच्या शिरावर चकमक चकमक छळकत आहेत, व तिसऱ्या हत्येपासून आणिक एक य ज्या समान कोणी शत्रु होऊन तुमचें ऐहिक सुख घालवून, तुह्मी आपल्या पदरांत चिर काल दुःखाचे पर्वत कवटाळून, धरून राहाणा र कीं काय? छे, छे, छे, अशा दुष्ट वासनेनें वि टाळलेल्या तुमच्या मनांस, एक वेळ विचार समु द्रांत बुडवून काढा, विचार जिवनाच्या पाण्या च्या आपल्यावर अभिषेक करून, घेऊन कुत्सि त वासनेस एकदां दक्षिण दिशा दाखवा- तुम्ही च जर आपल्यां मनांत या गोष्टीचा विचार

कराल, व हीं पापें आपणास कोणत्या रीतीनें जाच करतील. या विषयीं जर चांगला विचार कराल, तर तुमच्या मनांत येण्यास कांहीं अडचण पडणार नाहीं, सारांश तुह्मी आपल्या मनांत जर चांगला हा माझा उपदेश ठसवाल तर, या देहास एकंदरीनें पापांतच कष्ट काढीत राहावें लागेल, असें तुमचें तुह्मांसच वाटेल. तर नाशवंत धनाचा ओढा धरून, भगवंताचे अपराधी कां होऊं पहातां? जरी तुह्मांस एक शिकार साधली आहे, तथापि ती तुह्मांस कष्ट करणारीच आहे, सर्वांचें शासन करणारा, कधीं झोपीं गेलेला नसतो, तो तुमचें या वेळेस सत्य पाहात आहे. तुह्मांस तो अखेर दुःखांत पाडि ल्या शिवाय कधीं राहाणार नाहीं, या उपर जर तुह्मांस त्याचा घात करणें असेल तर करा, परंतु सांगतों पूर्वीं, मजला तिर्थाटण करण्यास आज्ञा द्या, आणि मग तुह्मांस करणें असेल तें करा; परंतु अशा या तुमच्या दुष्टव्रतांत मी कधींच मिसळणार नाहीं, मला तें तुमचें राज्य नको, धन

संपदा नको, दास दासी नको, सारांश ह्या एक घटकेच्या मृत्यु लोकीच्या सुखाचा मी भुकेलेला नाहीं. असें अघोर पाप करण्यास माझें मन अगदीं सुद्धां प्रवृत्त होत नाहीं. तुह्मांस जर या सुखाच्या घाटाघाटींत पडणें असेल तर पडा. मी आपण होऊन तर तुमच्या या दुष्ट बेताच्या थाऱ्यास सुद्धां उभा राहाणार नाहीं, या उपर तुमची मर्जी.

विशा० — भलारे बाबा, साधु शोभशील, बाबा इतका बोध करून होशील काय? "लोकां सांगे ब्रह्म ज्ञान आपण कोरडे पाषाण" या प्रमाणें बोध करणारा ढोंगी साधु भला साजशील, अरे आज पर्यंत आह्मीं जें जें कृत्य करीत आलों, त्या सर्वांत तूं मिसळून तें आचरण्यास तयार झालास, आणि हें मात्रच पाप काय? बाबा कोणती ही गोष्ट सिद्ध करणें झाल्यास, तिचा वाद विवाद पूर्वी आपणांशींच करावा, आणि जर तें आपणांस योग्य असें वाटेल तर चौघांत न्यावी, सभजलास, असें वेड्या सारखे बेत करूं नको.

दूबा० — आज पर्यंत जें मी पाप तुह्मां बरोबर

आचरण केलें; त्याचा माझे मनांत विचार होऊं लागला, ह्मणजे मला फारच मरणापेक्षां मरण होतें, परंतु गत गोष्टींचा आतां शोक करून उपयोग काय? पण बाबानो आतां अशीं वाईट कर्में आचरण्यांस, माझें मन अगदीं सद्धां पात्र होत नाहीं.

शाम॰ — दादा, त्याचा विचार आपल्याला पाहिजे तरी कशाला? तो किती झाला तरी आपणा सर्वांत लहान आहे, आणि त्याचा विचार घेतां घेतां, आपल्या क्रोधाचें शस्त्र बोथट होऊन त्या कपनिधींचा नाश करण्यास मात्रच असमर्थ होईल, आणि झालेले पाप निरर्थक होऊन पुन्हा दुःखांत मात्रच दिवस काढावे लागतील.

विशा॰ — बाबा इक्ष्वाकु, तूं तरी कांही त्याचा प्राण वाचवून आमचें पण कार्य सिद्धीस जाई अशी तरी तोड काढ, नाहीं तर आतां एकच सांगतों, आमच्यांत मिसळून सुख घ्यावयाचें असलें, तर वर सांगितल्या प्रमाणें मसलत काढून आमच्या पसंतीस आण, नाहीं तर त्याच्या सारखें

होऊन जें दुःख तुझ्या शरिराजवळून परमेश्वर भोगवील तें भोगण्यास तयार हो, या दोहों गोष्टी खेरीज आपली आमच्या हातून सुटका होणें नाहीं.

दूबा० — मग जर मी त्याचाच पक्ष धरला तर तुह्मीं मला मारणारना?

विशा० — अजून तूं अंदेशांत आहेस तर?

दूबा० — बरें, मारणार तर मारा; परंतु एक सांगतों, तुह्मीं आपल्या कृत कर्मांचें प्रायश्चित्त भगवंतापासून भोगिल्या शिवाय कधीं राहाणार नाहीं.

विशा० — अरे, ज्यापेक्षां आह्मी इतक्या हत्येचें पाप भोगण्यास मागें पुढें पाहिलें नाहीं त्यापेक्षां एक तुझ्याच हत्येचे पापास भिणार आहों की काय?

दूबा० — बाबानों, जर तुह्मी मलाच या गोष्टीचा बेत करावयास सांगणार, तर एक युक्ति सुचली आहे, ती तुह्मांस सांगतों, मग ती तुह्मांस पसंत होवो किंवा न होवो?

विशा० — येऊं द्या एकदां काय मसलत येत्ये ती, ऐकूं द्यात र खरी.

दूबा० — मला असें वाटतें, यास मारण्या

पेक्षां जर घोर अरण्यांत नेऊन सोडिलें तर?

विशा० — आणि त्याच्या नशिबाच्या जोरानें जर कोणी तेथें आला आणि त्यास वाचंविलें तर?

हिं० — ठीकठीक, हें घरच तुमच्या डोक्यावर पडून तुह्मीच मेला तर, नाहीं तर तुह्मी त्यास अरण्यांत सोडणार तोंच साक्षात ईश्वर प्रसन्न होऊन तुमचें ताडण करून त्यास अक्षय्य राजभोगण्यास दिलें तर, नाहीं तर त्यास त्या अरण्यांत वागणाऱ्या जनावरांनीं दयाभूत होऊन त्याचा नाश करावयाचा टाकून उलटें त्यांणीं आपल्या घरांत त्याचें पालन पोषण करून वाढविलें तर, वाहावा! उत्तम शंका! अशा अरण्यांत नेऊन सोडावें कीं, त्या ठिकाणीं साधारण प्राणी कशाला पाहिजेत; परंतु आपल्या सारख्या क्षत्रिय कुलांतील राजे सुद्धां शिकारीस येण्याची कल्पना होवूं नये, पण ठार मारणें हें कसें सेंभ वाटतें.

विशा० — पण त्याचा काय नेम आहे? कोणी येवून सोडविलेंच तर?

द्विबा० — योग्य; कोणी कडून मी मसलत काढीन ती तुह्मांस कबूल करावयाचीच नाहीं। मग उगीच मला श्रम देण्यांत होशील तरी कोण तें, मला आपले स्वइच्छेनें वागण्यास आज्ञा द्या. त्याची वाट तुह्मांस वाटेल तशी करा, परंतु सांग तों. क्षत्रिय कुलांत जन्म घेऊन वचनास मागें फिरणें हा आपल्या क्रियेला मोठा बट्टा आहे, त्या साध्वीस सती जाण्याचे समयीं आपण सर्वांनीं काय वचन दिलें आहे त्याची आठवण आहे नां, का. झाला विसर?

विशा० — कसें रे बाबानो, तुमच्या कसें विचारास येतें.

शाम०
रुपा० } — जसें दादा तुह्मी ह्मणाल तें आह्मांस अगदीं कबूल आहे, परंतु एक मात्र त्याच्या नादीं लागून भलतेंच करूं नका.

विशा० — द्विबाहू, समजलास तुझ्या सारखेंच झालेना आपण नाहीं आपल्या हातानें केलें इतकेंच कायतें, तसें कां होईना कोणी कडून मनोगत सिद्धीस जाऊन जर नांव, निराळें राहाण्यास

आगा मिळून असली तर कां सोडा. परंतु आतां एक आँ!

द्विबा० — कां बाबा, अजून "परंतु"-च काय कारण?

विशा० — नाहीं रे, परंतुचें कारण इतकेंच कीं, बोललास तसें अरण्य मात्रच शोधून तू काढावेंस.

द्विबा० — ठीक आहे, तें काम माझें. (मनांत) बापड्या "कृपनिधि" आतां तुला हे पापभिरु लवकरच व्याघ्रमुखीं देणार; आतां हे "राहू" तुला "चंद्राननास" लवकरच ग्रासूं पाहणार! परंतु जर तुझा साह्यकारी भगवंत असला, तर यांतून पार पडून यांस तुझ्या हातून शासन करवील. असो, (उघड) कां, झाला कीं नाहीं निश्चय.

विशा० — हो हो, दिल्या वचनाला मागें कोण फिरेल; खऱ्याला कोण आड काठी आणणार, तुला एकवार वचन दिलें तें दिलेंच.

द्विबा० — चला तर मग, (असें ह्मणून सर्व त्यास घेऊन घोर अरण्यांत नेऊन सोडितात.) कां हें भयंकर अरण्य श्वापदाचें केवळ माहेरच आहे. साधारण वीरांस कधीं या ठिकाणीं यवा-

सिकून जाणं कठीण आहे, मग त्याच्या येण्याचा तर संभव रुद्धां नाहीं (इतकें ह्मणून जातात.)

---

## प्रवेश २. अंक २.

(अरण्यांत कृपनिधी एकटा शोक करित बसला आहे.)

### आर्या.

शिव शिव शिव शिव प्रभु तूं, दुःखांमज आजि लोटिलें बापा॥
अनाथ आहें आपुला, आजि तुह्मां वंदितों अगा बापा॥१॥

### साकी.

मजवरि आजी वज्रासमतें, दुःख कसें पाडीलें॥
निर्दय होउनी काय अनाथा, शोकांतें धाडिलें॥१॥

(कृपनिधि आपल्याजवळ) भगवंता, माझ्या सारख्या पाप्याला आपल्या दासाच्या गळ्यांत बांधून, त्यांच्या नाशास मलाच कारण केलें काय। शिव शिव, ज्या प्राण्याच्या हातून त्यांची सेवाच व्हावी; त्या ठिकाणी उलटा त्यांच्या नाशासच मात्र साधनीयभूत झालों. हर हर, आणि

मी तरी केवढा चांडाळ! केवढा पापी! या माझ्या पापाचें जर एकंदर लेखन करूं लागलें, तर निर्दयपाषाण सुद्धां दयावंत होऊन मला दूषण देतील, तर, भगवंता! मला कशाला वाचविलेंस! अशाला वांचवून उलटा या भूमीवर मात्रच भार होणार. आणि उत्तरोत्तर पापाची समृध्धी होऊन पुढें यमराजाच्या जाचाला मात्रच पात्र होणार, या उपर आपली मर्जी.

नाहीं नाहीं, मी कोणी मोठाच चांडाळ आहें; नाहीं तर अशा अरंण्यांत आलेला असून कोणच्या ही श्वापदाच्या तडाक्यांत सांपडूनये. काय? नाहीं, अजून माझ्या पापाचें शासन होणें कांहीं तरी राहिलें आहे, ह्मणून आज सगळी रात्र आणि आतां सुमार मध्याचली सूर्य बिंब आलें आहे, मिळून एकंदर साहा प्रहर काय कोण्याच श्वापदाचे दृष्टीगोचर मी होऊंनये काय? (इतक्यांत एक व्याघ्र येऊन ग्रासण्यास पाहातो तों एक सिंह येऊन त्या व्याघ्राचें शासन करितो आणि चालूं लागतो) अरे, व्याघ्र माझा आहार

घेण्यास ही आला असून भगवंत त्याचें शासन करितात काय? असो,आतां एक त्याच्याच पाठी मागें लागावें, ह्मणजे कोणी सत्पुरुष असला तर पापांतून तरी मुक्त करील; नाहींतर त्यास राग येऊन या देहास शासन तरी करील. तर आतां हाच समय या देहाचा निर्णय होण्यास बरा दिसतो, या खेरीज दुसरें साधन कांहीं नाहीं (इतकें ह्मणून त्या जनावराचे मागें लागतो आणि त्यास गाठून त्याचे पुढें साष्टांग नमस्कार घालितो) महाराज,या प्राण्याचा निकाल आपल्या हातून झाल्या शिवाय आपले चरण सोडणार नाहीं. जरीं आपल्या बरोबर या देहास कष्ट होऊन प्राण जाऊं लागला व कदाचित् गेला; तथापि हा देह आपल्या चरणा पासून दूर होणें नाहीं, ज्यापेक्षां त्या व्याघ्राची उडी मजवर आली असून माझा तो, जों नाश करणार; तों आपण अकस्मात त्या स्थळीं उत्पन्न होऊन माझें रक्षण केलें! त्यापेक्षां आतां या शरिरास आपलें दर्शन देऊन जन्म मरणा पासून मुक्त होण्याचें साधन सांगून

मागीस अवस्था खेरीज आपलें वरण कधींसो
डणार नाहीं, आणि आपण मला जर यासमयास
चुकवून जाल तरं हा देह क्षणभर सुद्धां मृत्यु लो
काची वस्ती करण्यास पात्र होणार नाहीं. इत
क्यांत सिंहाचें स्वरूप टाकून साधूस्वरूपी होतो,
बाबा, तुझ्या या सकुमार कोमल स्वरूपाचा
नाश करणार असें मला भासले, त्या वेळेस या
देहास अमोघ मायेचा पूर येऊन माझे हृदयीं
मोठी दया उत्पन्न झाली, आणि त्या दुष्टापासून
तुला मुक्त करावें असें चित्तास वाटलें, त्या वेळे
स बालकाची दया उत्पन्न झाली, तिणें माझें चि
त्त असें उद्विग्न करून टाकिलें कीं, तुला या संक
टापासून मुक्तच करावें, असें मायेनें माझें स
र्व शरीर व्याप्त करून टाकिलें; तेव्हां मी या ठिका
णीं येऊन मोठ्या यत्नानें तुझ्यावर आलेल्या
प्रसंगांतून ईश कृपेनें पार पाडिलें, आतां मी
तुला असें विचारितों कीं, तूं केवळ पांच वर्षांचा
सकुमार बालक असून ज्या ठिकाणीं मोठमोठ्या
शूरांस सुद्धां येण्याचा व त्यांतून यश घेऊन

जाण्याचा प्रसंग माझ्या दृष्टीगोचर झालेला कधीं स्मरत सुद्धां नाहीं, तर अशा ठिकाणीं तुला अना थाला आणून कोणीं टाकिलें? ज्याचें मुख पाहून महान निर्दयास सुद्धां दया येईल, व तुझें कल्याणच चिंतील, अशावर अरण्य वास करण्याचा प्रसंग कोण्या निर्दया पासून प्राप्त झाला. आणखी तुझें मूळ रहाणें कोठे? तुझ्या आईबापाचीं नावें काय? सारांश तुझी पूर्व स्थिति कशी आहे ती एक वेळ मला या कर्णद्वारें ऐकून घेतलीच पाहिजे, तर जें एकंदर तुला यावतजन्म सुख किंवा दुःख झालें असेल तें ऐकिल्या खेरीज माझ्यानें राहावतच नाहीं, याज करितां तूं आपली मुळा पासून जी कांहीं कर्मे भोगिलीं असशील तीं मला सर्व सांग.

कृप० — गुरु राज, मी जन्म घेतल्या पासून ही वेळ पर्यंत जे या देहास एकंदर सुख दुःखाचें ग्रहण करावें लागलें तें आपणांस मी कथन करितों, परंतु या देहीवर दयाभूत होऊन व एकंदर झालेल्या गोष्टींचा विचार आपल्या कोमळ

हृदयीं करून या दुःखापासून सोडविणारें आपल्या शिवाय दुसरें कोणी समर्थ दिसत नाहीं, याज करितां, पूर्वी आपले अभय हस्त या शिरीं पडतील, ते समयी हा देह खालीं पडून निर्भय पणें आपली पूर्व स्थिति सांगेल.

गुरू०— अरे, तूं आपलें पूर्व दुःख विसरून अगदीं निखालस परमेश्वर सामीप्याच गोष्टी सांगतोस खऱ्या; परंतु आपल्या सुख दुःखाचें कथन केल्या शिवाय पूर्वी तुला कांहींच वचन मिळणें नाहीं.

रूप०— महाराज, आपण स्वस्थपणें ऐकावें, सांगतों-पूर्वी मी सोमपुरीतील शूरसेन ह्मणून राजा होता, त्यास फार दिवस पुत्र संतती नव्हती त्यावर त्यांणीं त्याच शहरांतील विश्वेश्वर ह्मणून सांभाचें देवालय आहे, त्या देवताची सेवा केल्यावरून, त्याचे पोटीं या दुष्ट घातकी देहाचीच योजना ईश्वरा कडून झाली, पुढें माझें वय सुमारें चारवर्षांचें होत आलें व मला ही कांहीं थोडें थोडें समजूं लागलें, तों एके दिवशीं माझे

तीर्थरूप नित्य नियमाप्रमाणें, दोन प्रहर रात्री चे समयास देवदर्शन व पूजा वगैरे करण्याक रितां गेले असतां, तेथें त्यास विपरीत होऊन अक्षय सुख भोगण्याचें स्थळ जें कैलास, तेथें गमन केलें, पुढें माझ्या मातोश्रीनें, वैधव्य पद रीं बांधून आपलें कृष्णवदन कोणांस दाखवूं नये, व या माया पाशांत पडूं नये, ह्मणून सर्वा चा धिक्कार करून, पती समागमें सती जाण्या चें पत्करिलें, त्यास सुमारें दोन दिवस झाले ना हींत तों माझ्या सावत्र चुलत्यानीं मी दुष्ट, चांडा ळ, घातकी, अभागी इत्यादि दोष ठेवून माझें मुखावलोकन सुद्धां करूंनये, असा त्याणीं आ पले मनाचा निश्चय करून मला या अरण्यांत आणून सोडिलें आणि या ठिकाणीं ह्या माझ्या वर जो दुष्टप्रसंग येणार, तो आपण दयाभूत होऊन माझें रक्षण केलेत, या खेरीज मला आ पल्या भोसुकुलाची दुसरी कांहींच माहिती नाहीं.

गुरू. बरें, जर आतां तुला चांगल्या स्थळीं ने ऊन सोडिलें आणि त्या ठिकाणीं तुझ्या अन्न व,

त्याची सोय झाली तर, तूं या गोष्टीस रुकार देशी
ल कीं नाहीं?

कृप०— आपल्या चरणापाशीं; आतां दासाची
एकच विनंती आहे; कीं जर जन्ममरणां पासून
मुक्त कराल, तर या देहास कांहीं दिवस या लोकीं
राहाणें पडेल, नाहींतर आपण एकवेळ, या ठि
काणा पासून या देहाचा निकाल; माझ्या मना
प्रमाणें झाल्या शिवाय जर आपलें गमन झालें
तर, मीं यमसदनाची वाट धरिल्या खेरीज,
दुसरा कोणता उपाय साध्य करणार नाहीं.

गुरु०— बरें आहे, आतां तुला सांगतों तें ऐकून
घे आणि त्या प्रमाणें चाल.

कृप०— सांगा, पण वरील माझ्या बोलण्यांवर
नजर देऊन; माझे मना सारिखें सांगा, या वेळेस
मला असें वाटत आहे कीं, मोठा जल मेघांचा
डंबर आला असतां आकाशास लपवून टाकि
तो; तथापि तिकडे एकवार वायूची दृष्टी झाली
ह्मणजे, एका क्षणांत त्याचें सगळें पोकळपण दूर
करून; आकाशास त्याचे अवडंबरा पांसून मुक्त

करितां; तसाच मी ज्या विघ्नानें आच्छादित झालों आहे त्यावर आपण वायुरूप धरून, मला त्या आकाश सारिखें निर्दोषी करून टाकून या दुःखांतून मुक्त तर करालच, परंतु आपले चरणाचा या देहास विसर न होई असें मला एक वासना फळ; माझ्या शरिरीं अखंड वास करी असें, आपल्या चरण रजःकणाचे आशिर्वादानें साधन करून घा. ह्मणजे आपण दिलें, त्याचें मी यावत्‌जन्म सुख मानून आपलें सर्व आयुष्य मोठ्या आनंदानें काढीन.

गुरु — ठीक आहे, तूं कांही काळजी करूंनको, तुझे मी सर्व कष्ट ऐकून, माझें मन तुजवर दया करण्यांस अगदीं सुद्धां मागें पुढें पाहणार नाहीं, तूं त्याचा, अगदीं खेद वाळगूंनको. तुझे सर्व मनोगत सिद्धीस जाईत, असें तुझें कल्याण करावें, असाच या देहाचा निश्चय होऊन चुकला आहे, भगवत् सत्तेनें तुझ्यावरील सर्व विघ्नें निवारण होऊन, लवकरच आपलें सुख भोगूं लागशील. आतां, तुला एक पंचाक्षरी मंत्र सांगतों, त्या पा-

सून तुला नारायण लवकर स्मरण देईल. ( इतक्यां त पंचाक्षरी मंत्राचा उपदेश करितो. ) आणि ही एक जागा तुला योजून देतों, इतक्या जाग्यांत जगदीश कृपेनें, कोणाच्या ही दुष्टाची येण्याची इच्छा होणार नाहीं. ( इतकें सांगून गुप्त होतो. )

**कृप०** — नारायणा, आतां या माझ्या तपश्चर्येवर आपण नजर देऊं नये; परंतु या सत्पुरुषाच्या वचनावर मात्र नजर पोंचवावी.

---

## प्रवेश ३रा. अंक २रा.

( अरण्य. ) कृपनिधि एकांत तपश्चर्या करीत आहे.

**देव०** — जाणें, अनन्यभावें मला शरण येऊन, माझ्या दर्शनाचीच आशा धरिली, त्याचा विसर करणें हें माझ्या नांवाला मोठें दूषण आहे; आणि त्याचे ठिकाणीं पुण्यांश ही पुष्कळ सांचून गेला आहे. जसा एकादा खाडा मात्र निर्मल उकरून ठेविला असतां, त्यांत मेघांच्या एक एक थेंबानें भरून, तृषायुक्त जनांस तो केवळ कल्पवृक्षच होतो, तसेंच,

पांच वर्षां पूर्वी आपल्या संततीच्या पापास धनी, सर्वथैव आईबापच असतात; आतां या मानानें त्याचें वय ही तितकेंच आहे, तर तो निष्पापी असून, त्या मेघोदका सारखें त्याच्या पदरीं महान ऋषीच्या गुरुच्या पंचाक्षरी मंत्रापासून मेघाच्या धारारूप जें पुण्य, तें त्या एक दयावरच श्रवूं लागलें आहे, तर, त्या मंत्राच्चे सामर्थ्यें करून माझे वासनेस तो कृपनिधि हाच कोणीं स्तंभ होऊन, त्या मंत्राच्या दोरानें मला त्योणीं आपल्याशीं मोहून टाकिलें त्या पेक्षां त्यास आतां वर देऊन नीतीचें राज्य करण्यास सांगून दुष्टाचें शासन करण्यास आज्ञा देतों. ( इतकें ह्मणून त्या कृपनिधीजवळ येऊन ) भक्ता कृपनिधी, अरे तुझें तप आणि स्वरूप, वज्रासमान पंचाक्षरी मंत्र, आणि महान साधूचें वचन, अशा चार गोष्टी मदनवत माझ्या इच्छेस वळवून घेऊं लागल्या. तेणें करून माझें मन तुझ्यावर वळून तुझ्या इच्छेस तृप्त करण्या करितां मी स्वतां तुझ्या पुढें येऊन उभें राहिलों आहें. वज्राप्ती करितां तूं अघटित कृत्य पत्करिलें स तोच

मी स्वतां तुझ्या पुढें उभा राहून तुझी इच्छा तृप्त कर ण्यांस तयार आहे तर, आतां जी तुझी इच्छा असेल ती तृप्त करून घे (इतकें ह्मणून कृपनिधी डोळे उ घडीत नाहीं असें पाहून त्यास हातानें हालवून) दासा पुरें कर, अरे एक वेळ डोळे तर उघडून पाहा. (कृपनिधीनें भगवंतास अवलोकन करून)

कृप० — महाराज, आपल्या चरणाची प्राप्ति इ तक्या लवकर होईल, असें मनांत स्वप्नीं आलें ना हीं व मोठ्या साधूच्या मंत्रा पासून इतक्या मोठ्या यातनेतून, थोड्याच काळांत पार पडून जाईन, अ सें ही मनांत आलें नाहीं, सारांश ह्या भवनदींतून माझें शरीर हें केवळ तारूं वायूच्या जोरा खेरीज स्व कष्टानें लवकर पार पडून जाईल असें मी वाटत न व्हतें; परंतु गुरूच्या वचनांवर भरंवसा ठेविला त्याचे योगें करून या यातनेंतून मुक्त झालों; आ ज मी आपल्या जन्माचें सार्थक केलें; आजचाच दिवस मला सुदीन झाला; आज पर्यंत घालवि लेल्या व पुढें येणाऱ्या दिवसांत हाच दिवस शि रोमणी होऊन बसेल असें मला वाटतें. महाराज,

हे प्रताप आपल्या चरणाच्या कृपेचे आहेत.

देवऋ०— (प्रसन्न होऊन) आतां तुझी इच्छा असेल तें माग.

कृप०— महाराज, आपलें स्वरूप अवलोकन करून मला असें वाटतें कीं, आपण कोणी यमासारख्यास सुद्धां शासन करणारे आहांत असें निःशंक मनांत येतें आणि आपण माझी इच्छा पूर्ण करणार तर, ज्यानीं माझ्या मातापितरांस दुःख दिलें असेल त्याचें शासन माझे हातून करवा.

देवऋ०— (प्रसन्न होऊन) तुझ्या आईबापावर तुझ्याच सावत्र चुलत्यानीं असा दुष्ट प्रसंग आणिला तर त्यांचें तू भगवत सत्तेनें शासन कर आणि सुखानें नांदून दुष्टास शासन करून नीतिमान जनाचें आपल्या पुत्रा प्रमाणें रक्षण कर जे या पृथ्वींत विनाकारण प्रजेस त्रास देणारे किंवा अनीतीनें वागणारे राजे असतील त्यांचें शासन कर (इतकें सांगून गुप्त होतो)

कृप०— (मनात) काय ते इतके कृतप्र अं!

मी स्वतां तुझ्या पुढें उभा राहून तुझी इच्छा तृप्त करण्यांस तयार आहे तर, आतां जी तुझी इच्छा असेल ती तृप्त करून घे ( इतकें ह्मणून कृपनिधी डोळे उघडीत नाहीं असें पाहून त्यास हातानें हालवून ) दासा पुरें कर, अरे एकवेळ डोळे तर उघडून पाहा. (कृपनिधीनें भगवंतास अवलोकन करून)

कृप० — महाराज, आपल्या चरणाची प्राप्ति इतक्या लवकर होईल, असें मनांत स्वप्नां आलें नाहीं व मोठ्या साधूच्या मंत्रा पासून इतक्या मोठ्या यातनेतून, थोडयाच काळांत पार पडून जाईन, असें ही मनांत आलें नाहीं, सारांश ह्या भवनदींतून माझें शरीर हें केवळ तारूं वायूच्या जोरा खेरीज स्वकष्टानें लवकर पार पडून जाईल असें तीं वाटत नव्हतें; परंतु गुरूच्या वचनांवर भरंवसा ठेविला त्याचे योगें करून या यातनेंतून मुक्त झालों; आज मी आपल्या जन्माचें सार्थक केलें; आजच्याच दिवस मला सुदीन झाला; आज पर्यंत घालविलेल्या व पुढें येणाऱ्या दिवसांत हाच दिवस शिरोमणी होऊन बसेल असें मला वाटतें. महाराज,

हे प्रताप आपल्या चरणाच्या कृपेचे आहेत.

देवऋ॰ — (प्रसन्न होऊन) आतां तुझी इच्छा असेल तें माग.

कृप॰ — महाराज, आपलें स्वरूप अवलोकन करून मला असें वाटतें कीं, आपण कोणी प्रमासारख्यास स्कद्वां शासन करणारे आहांत असें निशंक मनांत येतें आणि आपण माझी इच्छा पूर्ण करणार तर, ज्यानीं माझ्या मातापितरांस दुःख दिलें असेल त्याचें शासन माझे हातून करवा.

देवऋ॰ — (प्रसन्न होऊन) तुझ्या आईबापावर तुझ्याच सावत्र चुलत्यानीं असा दुष्ट प्रसंग आणिला तर त्यांचें तू भगवत सत्तेनें शासन कर आणि स्करवानें नांदून दुष्टास शासन करून नीतिमान जनाचें आपल्या पुत्राप्रमाणें रक्षण कर जे या पृथ्वींत विनाकारण प्रजेस त्रास देणारे किंवा अनीतीनें वागणारे राजे असतील त्यांचें शासन कर (इतकें सांगून गुप्त होतो)

कृप॰ — (मनात) काय ते इतके कृतघ्न अँ!

उगाच नीतीमान पुरुषास छळ देणारे चांडाळ, ठीक आहे. पूर्वी त्यांचा सूड उगवून त्यांस चं शासन करीन त्यावेळेस हा जीव खाली पडेल.

---

## प्रवेश ४ अंक २रा.

स्थळ (सोमपुरी) कृपनिधी, विशालाक्ष, रुपाक्ष, शामदत्त आणि द्विबाहु.

**कृप॰**— (मनांत) आतां ते ज्या गोष्टीनें आपल्या रागास प्रज्वलीत करून युद्धासच तयार होतील अशा गोष्टीनीं यांचें चित्त मोहीत केलें पाहिजे. दुसऱ्या गोष्टीची योजना पूर्वी करणें नको (आपल्या चुलत्यांजवळ जाऊन त्यांस) वीर हो मी, वनपुरीतील राजाचा पुत्र, तुमच्याशीं युद्ध प्रसंग करून तुम्हां पासून कांहीं खंडणी घेऊन जावें हाच उद्देश या देहाचा आहे, आतां असें तुमचे विचारास येऊन तुह्मी ज्या गोष्टीस रुकार द्याल, त्या गोष्टीस मी तयार आहे.

**विशा॰**— आह्मी या नगराचे सतत पांच सात पिढ्या राज्य करीत आलों; परंतु ही वेळ पर्यंत

या नगरांतून कोणीं ही शूरानें युद्धाचें नाव काढ लें नाहीं असें असून तूं लहान कोमल राजपुत्र या ठिकाणीं येऊन आह्मांस मोठ्या शूरत्वाच्या गोष्टी सांगून एकदम सर्व राज्य सोडण्यास सांगतोस तर तुला लाज कांहीं वाटत नाहीं. एकाद्या व्याघ्रमेळ्यांत बिचारी एकटी गाय जाऊन त्या सर्व व्याघ्रांस शासन करून आपण विजयी झाली असें कधींतरी झालें आहे काय? जा, चालता हो आपल्या आल्या रस्त्यानें; तुला आह्मां पासून एक फुटकी कवडी सुद्धां मिळणार आहे.

कृष्ण०— अहो, मला तुमचे दाखले कशाला पाहिजेत? दाखल्यावरच आलांत तर, हत्तीच्या कानात मुंगीचा प्रवेश झाल्यानें त्याडोंगरासारख्या प्राण्यास मृत्यु यावा काय? नाहींच, परंतु भगवंताच्या घरचे शाप ज्यांच्या शिरीं असतात ते कसे ही जरी शूर असले तरी त्यांचीं शूरत्वें नष्ट होऊन वाघासारख्यांस सुद्धा हतभाग्य व्हावें लागेल; परंतु तुम्हां जवळ या वादविवादाच्या गोष्टी कशाला पाहिजेत? माझ्या प्रश्नाचें उत्तरधा.

विशा०— तुझें कोमल रूप पाहून आनंदें मन दयाभूत झालें आहे, तर आतां युद्धाचा अभिलाष करून तुझ्या सारख्या कोमल स्वरूपाचा नाश करणें हें अगदीं कसेंसें वाटतें, यास्तव तुला जिवदान दिलें आल्या रस्त्यानें चालता हो.

कृप०— युद्धाचा त्याग करून मायाभूत गोष्टी सांगण्यास तुह्मांस लाज वाटत नाहीं काय? निरपराधी प्राण्यांचा घात करणें हाच तुमचा धर्म काय? लाहान बाळकास अरण्यांत सोडणें हीच तुमची दया काय? शूरानीं अग्रभागीं उभें राहून यश मिळवावें तरच ते वीर आणि दयाभूत असे मानले जातात व वाईट गोष्टीनीं आपल्या नांवास कलंक मात्र येतो (इतकें बोलून युद्ध करून त्यांस बंधन करितो व आपण विश्रांति घेण्यास जातो) बरोबर असलेल्या लोकांस तुह्मीं हीश्रम पावलां आहां ह्मणून क्षणभर विश्रांति घ्या वयासआ.

**समाप्त.**